महाराष्ट्र शासन
प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य, मुंबई
९ वा मजला, न्यु एक्सेलसिअर इमारत, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१
ई-मेल : maharashtra.ara @gmail.com वेबसाईट :www.maha-ara.org

क्र.वैशिप्र-१०१९/प्र.क्र.१२/सीईटी/पीजी/प्रवेश प्रक्रिया/परिपत्रक/२०१९/93 दिनांक: ०७/०१/२०१९

# परिपत्रक

**शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता वैद्यकीय/दंत पदव्युत्तर पदवी /पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता नोंदणी प्रक्रियेबाबत.**

विषयांकित प्रकरणी सर्व संबंधित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील राज्यातील शासकीय/ महापालिका/ शासन अनुदानित/ अल्पसंख्याक/ खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय/दंत पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ज्या महाविद्यालयांनी यापुर्वी प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या "**www.safalta.org**" या ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी केलेली आहे अशा महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयातील प्रवेशाबाबत **दिनांक १०/०१/२०१९ ते ३१/०१/२०१९** या कालावधीमध्ये सदर पोर्टलवर संस्थेच्या लॉगीनद्वारे खालील आवश्यक कागदपत्रे अपलोड/सादर करणे अनिवार्य आहे.

१) भारतीय वैद्यकीय/दंत परिषद (MCI/DCI) यांचेकडील मान्यतेचे पत्र.
२) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता प्राप्त संलग्नीकरण ची प्रत.
३) शासनाकडून मान्यता प्राप्त झालेल्या शासन निर्णयाची/पत्राची प्रत.
४) भारतीय वैद्यकीय/दंत परिषद, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांच्या नियमानुसार उपलब्ध शिक्षक वर्ग.
५) शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता उपलब्ध शिक्षक वर्गानुसार भरण्यात येणाऱ्या जागा
६) शिक्षण शुल्क समितीकडून निश्चित करण्यात आलेल्या शैक्षणिक शुल्काची माहिती
७) अधिष्ठाता/प्राचार्य यांचे हमीपत्र

उपरोक्त नमूद कालावधीमध्ये ज्या महाविद्यालयांकडून ऑनलाईन पोर्टलद्वारे वरील नमूद कागदपत्रे सादर करु शकणार नाहीत अशा संबंधित महाविद्यालयांचा शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभाग करण्यात येणार नाही याची संबंधित महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

**सचिव,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य
संबंधित सर्व वैद्यकीय/दंत महाविद्यालये
महाराष्ट्र राज्य.

प्रत : १) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गो.ते.रुग्णालय आवार, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई ४००००१
२) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई - ४००००१